## अर्ज निशाणी क्रमांक ५५ वर आदेश

(पारीत केलेला दिनांक **१८.०९.२०२३**)

०१. प्रस्तूत अर्ज प्रतिवादींनी वादीचे सा.क्र.०२ चे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.५० वर दिनांक **१३.०७.२०१३** रोजी झालेला **"उलटतपास नाहीचा"** आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. **प्रतिवादींचे असे कथन आहे की,** प्रतिवादींना महत्वाची माहिती प्राप्त करणे बाकी असल्याने उलटतपासासाठी हजर राहू शकले नाहीत.

०३. **वादीचे असे म्हणणे आहे की,** प्रतिवादींना वेळोवेळी संधी देऊनही त्यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही, म्हणून अर्ज रद्द करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादींतर्फे विधीज्ञ **श्री. एम. पी. शेख** आणि वादींतर्फे विधीज्ञ **श्री. एम. टी. शिंदे** यांचा युक्तिवाद ऐकला.

०५. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादींना वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी नाकारल्यास त्याचे नुकसान होईल.

०६. प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल.

०७. म्हणून प्रतिवादींविरुध्द वादीतर्फे सा.क्र.०२ चे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.५०** वर झालेला **"उलटतपास नाहीचा"** आदेश रद्द करणे उचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.५५** मंजूर करण्यात येतो.

२. वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.५०** वर प्रतिवादीविरुध्द **"उलटतपासणी नाही"** असा झालेला आदेश रद्द करण्यात येतो. प्रतिवादींनी पुढील तारखेस कोणतीही सबब न सांगता शपथपत्र **नि.क्र.५०** वर उलटतपास घ्यावा.

SUBHASH LAXMAN PHULE
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.09.18 16:38:14 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– १८.०९.२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**